**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ८०/२०२३**

**तक्रारकर्ता,** श्री.अनिल हनुमंत जाधव,
किशोरी अपार्टमेंट, रुम नं.३०५,
३ रा मजला, आधार हॉस्पीटल जवळ,
धर्मवीर मार्ग, पाचपाखाडी, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६०२.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे,
महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार
वैद्यमार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६०२

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे,
महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार
वैद्यमार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६०२

विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शहर विकास
व नियोजन अधिकारी, शहर विकास विभाग, ठाणे
महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी
जनरल अरुणकुमार वैद्यमार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी,
ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२

तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शहर विकास
व नियोजन अधिकारी, शहर विकास विभाग, ठाणे
महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी
जनरल अरुणकुमार वैद्यमार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी,
ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २४/७/२०२५**

| **माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक** | **जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक** | **प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक** | **प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक** |
|---|---|---|---|
| **२९/११/२०२२** | **----** | **३०/१२/२०२२** | **१६/१/२०२३** |

तक्रारकर्ता यांनी दि.१९/१/२०२३ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २४/७/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्त्यांचे प्रतिनिधी ॲड. स्वप्नील स.सांळुके उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *स.नं.४९,, ४९अ/४९ब बाबत माहिती मिळणेबाबत व इतर माहिती* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१६/१/२०२३ रोजी, "*सदर अर्जदार /अपिलकर्ते यांस माहिती अधिकार अर्जात नमुद केलेल्या भुखंडाबाबत मंजूर विकास आराखडयानुसार D.P. Part Plan ची प्रत शुल्कांची आकारणी करून सात दिवसांत अदा करण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणी सूचना प्राप्त होऊन देखील अनुपस्थित आहेत. कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसून येते की, प्रथम अपीलीय अधिकारी तथा शहर विकास व नियोजन अधिकारी, शहर विकास विभाग, ठाणे मनपा यांनी दि.१६/१/२०२३ रोजी आदेश पारित केल आहे. त्याव्दारे निर्देशित केले की, सदर अर्जदार

/अपिलकर्ते यांस माहिती अधिकार अर्जात नमुद केलेल्या भुखंडाबाबत मंजूर विकास आराखडयानुसार D.P. Part Plan ची प्रत शुल्कांची आकारणी करून सात दिवसांत अदा करण्यात यावी.

यासंदर्भात युक्तिवाद करताना तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी निवेदन केले की, मंजूर सुधारित विकास योजनेची जी प्रत त्यांना देण्यात आलेली आहे तीसुध्दा चुकीची देण्यात आली आहे. त्यांनी सर्वे नं.४९, ४९अ, ४९ब या सर्वे नंबरबाबतची माहिती मागितली होती तर मंजूर विकास योजनेची जी प्रत देण्यात आलेली आहे, ती सर्वे नं.४१ व ४५ ची देण्यात आलेली आहे. म्हणजेच मागितलेल्या माहितीनुसार आपणास माहिती दिलेली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, विकास योजना अंमलबजावणी कक्ष, शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केल्यानुसार सर्वे नं.४९, ४९अ, ४९ब या जागेचे सुधारित मंजूर विकास योजनेची प्रत ही माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.राम जाधव, उप अभियंता, विकास योजना अंमलबजावणी कक्ष, शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २९/११/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्यामुळे त्यांना योग्य ती माहिती मिळण्यास विलंब झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.९/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २४ जुलै, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राम जाधव, उप अभियंता, विकास योजना अंमलबजावणी कक्ष, शहर विकास विभाग, ठाणे मनपा -- **यांना प्रत**
--- विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
विकास योजना अंमलबजावणी कक्ष, शहर विकास विभाग,
ठाणे महानगरपालिका, महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्यमार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२ **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदरची प्रत संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणी आज दिनांक ९/९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तक्रारकर्त्यांचे प्रतिनिधी ॲड स्वप्नील साळुंके उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुहास राणे, उप अभियंता, शहर विकास विभाग, ठाणे मनपा व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.राम जाधव सध्या कार्यरत- कार्यकारी अभियंता, शहर विकास विभाग, ठाणे मनपा उपस्थित आहेत.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.राम जाधव व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुहास राणे यांनी एकत्रित खुलासा केला की, प्रथम सुनावणी आदेशाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना डीपी प्लान पार्टची प्रत दि.१६/१/२०२३ रोजी दिली आहे. सदर डीपी प्लान मिळालेबाबत तक्रारकर्ता यांनी स्वाक्षरी केली आहे. म्हणजेच तक्रारकर्ता यांना आयोगाच्या दि.२४/७/२०२५ रोजीचे आदेश पारित होणेपूर्वीच प्रत दिली आहे. तसेच आता पुन्हा सदर प्लानची प्रत त्यांना पुरविण्यात येत आहे. म्हणून हा खुलासा मान्य करून शास्ती कारवाई करण्यात येऊ नये अशी विनंती दोन्ही अधिकारी यांनी केली.

श्री.राम जाधव यांचा खुलासा बघता निदर्शनास येते की, त्यांनी दि.१६/१/२०२३ रोजी जी माहिती तक्रारकर्ता यांना दिली आहे ती चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे प्रथम दर्शनी दिसून येत असल्याने त्यांचा खुलासा मागविण्यात आला होता. तथापि त्यांनी यासंदर्भात कोणताही खुलासा केलेला नाही. सादर खुलाशामध्ये ते केवळ एवढेच नमूद करतात की, दि.१६/१/२०२३ रोजी तक्रारकर्ता यांना माहिती दिली आहे. दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी का दिली याबाबत त्यांच्या खुलाशा मध्ये काहीही नमूद नाही. म्हणजेच त्यांनी समाधानकारक खुलासा सादर केलेला नाही हे स्पष्ट होत आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.राम जाधव, उप अभियंता, विकास योजना अंमलबजावणी कक्ष, शहर विकास विभाग, ठाणे मनपा (सध्या कार्यरत- कार्यकारी अभियंता, शहर विकास विभाग, ठाणे मनपा ) यांनी आयोगास सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना दि.२४/७/२०२५ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२०००/- (अक्षरी रु.दोन हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून १ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन (रक्कम जमा केलेल्या चलनाच्या छायांकित प्रतीसह ब्दितीय अपील क्रमांक स्पष्ट नमूद करून) पूर्तता अहवाल उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, ठाणे महानगरपालिका यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

२. तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झाल्याने, तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ९ सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

२) उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३) उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग,
ठाणे महानगरपालिका, महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्यमार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२

४) आस्थापना अधिकारी / आहरण व संवितरण अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, ठाणे महानगरपालिका, महापालिका भवन,
सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्यमार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२

५) श्री.राम जाधव, (तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, शहर विकास विभाग, ठाणे मनपा)
कार्यकारी अभियंता, शहर विकास विभाग,
ठाणे महानगरपालिका, महापालिका भवन,
सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्यमार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२